**नियमीत दिवाणी दावा क्र.१०९/२०१६ मधील  निशाणी क्र.११८ खालील आदेश**

**पंजाब खडसे वि. दिलीप खडसे व ईतर**

**CNR No. MHWS020003032016**

प्रतिवादी क्र.१ याने दाखल केलेल्या प्रकरण क्र.एमसीए.५/शेलु खडसे/१३/२०१४–१५ या प्रकरणामध्ये मा. तहसिलदार यांनी दिनांक २५/११/२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ याला वादी यांचा सर्वे क्र.१३८ मधील ज्या पोट हिश्यात रस्तयाची हद्द असेल तेथून पुढे सर्वे क्र.१३६, १३५, १३४ मधील असलेला जुना रस्ता वहिती करुन अडविलेला रस्ता खुला करुन सदर रस्त्याची वहिवाट करतांना कोणीही अडथळा निर्माण करु नये अशा प्रकारचा आदेश पारीत करण्यात आला होता. त्या आदेशाविरुद्ध वादीने प्रस्तुत दावा दाखल केला असून तो प्रलंबित आहे. सदर दावा प्रलंबित असताना दि.२०/०६/२०१६ रोजी मा. तहसिलदार तथा मालमतदार रिसोड यांनी मौजे शेलू खडसे येथील प्रतिवादीने केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करुन पर्यायी रस्ता प्रतिवादी व सर्व शेतकरी यांना उपलब्ध करुन देण्यात आला होता. असे असताना वादीने सदर पर्यायी रस्ता बंद करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे प्रतिवादी याला त्याच्या गट क्र.३४८ मधील १ हे. ०४ आर शेतजमीन वहिती करणे कठीण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे व त्यामुळे त्याचे पुढील हंगामामध्ये खूप नुकसान होण्याची शक्यता आहे.

०२. वादी त्याच्या मालकीच्या शेतामधील नदीच्या काठाने जाणारा पर्यायी रस्ता वहितीत व त्यावर काटेरी कुंपन लावण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे प्रतिवादीला त्याच्या शेताची वहिती करणे शक्य होणार नाही. प्रतिवादीने वादीला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता वादीने प्रतिवादीला अरेरावीची भाषा केली, त्यामुळे प्रतिवादीला सदरहू अर्ज दाखल करणे भाग पडले. प्रतिवादी याच्याकडे शेती व्यतिरीक्त ईतर कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. सदरहू अर्जाचा

समतोल हा प्रतिवादीच्या बाजूने आहे. म्हणून प्रतिवादी याने अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे मा. तहसिलदार साहेब, रिसोड यांनी दिलेल्या पर्यायी रस्त्यामध्ये वादीने अडथळा निर्माण करु नये, प्रतिवादीला त्याच्या शेताची वहिती करण्याकरीता सदरहू दाव्याच्या निकालापर्यंत सदर पर्यायी रस्त्यावरुन जाण्याकरीता प्रतिवादीला वादीने किंवा त्याचे नोकरचाकर, हितसंबंधीत यांनी अडथळा निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो वादी याच्याविरुध्द पारित करण्याकरिता प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ३९, नियम १ व २ सह कलम १५१ अन्वये प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे उत्तर वादीतर्फे **निशाणी क्रमांक ११९** वर दाखल करण्यात आले आहे. वादीच्या कथनांनुसार प्रतिवादीचा हा अर्ज प्रतिपालनीय नाही. वादीच्या कथनानुसार आदेश ३९, नियम १ बी. आणि सी. नुसार फक्त प्रतिवादीस तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी करता येईल. सदर नियमानुसार प्रतिवादीस अर्ज करता येणार नाही. त्यामुळे हा अर्ज प्रतिपालनीय नाही असे वादीने कथन केले आहे. वादीच्या पुढील कथनानुसार या प्रकरणी न्यायालयाने मुद्दे कायम केले असून वादीने त्याचा पुराव्याचा प्रतिज्ञालेख दि.२८/०२/२०२३ रोजीच दिला आहे. असे असतानाही प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने प्रतिवादीने हा अर्ज केला आहे. वादीच्या पुढील कथनाप्रमाणे प्रतिवादीस त्याच्या शेतात जाण्यासाठी रस्ता असून सदर बाब न्यायालयाने नियुक्त केलेल्या कमीशनरच्या अहवालात स्पष्ट झाली आहे. त्यामुळे हा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

०४. वादी व प्रतिवादी क्र.१ च्या उपरोक्त कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झालेले आहेत. सदर मुद्दयांवर खालील कारणमिमांसेसह मी माझे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | तात्पुरता मनाई हुकूम मंजूर होण्याकरीता प्रथमदर्शनी प्रकरण प्रतिवादी क्र.१ च्या बाजूने आहे काय ? | नकारार्थी. |
| २ | न्यायिक समतोल प्रतिवादी क्र.१ च्या बाजूने आहे काय ? | नकारार्थी. |
| ३ | प्रतिवादी क्र.१ च्या विनंतीप्रमाणे तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश त्याच्या बाजूने न झाल्यास त्याचे अपरिमित नुकसान होईल काय ? | नकारार्थी. |
| ४ | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ करिता –**

०५. प्रतिवादी क्र.१ याने हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ व २ तसेच कलम १५१ नुसार केला आहे. प्रतिवादी क्र.१ च्या कथनानुसार नायब तहसिलदार रिसोड यांनी दि.२६/०६/२०१६ रोजी प्रतिवादी क्र.१ व इतर शेतक–यांनी केलेल्या अर्जावर आदेश पारीत करुन पर्यायी रस्ता मोकळा करुन देण्याचा आदेश दिले होते. प्रतिवादी क्र.१ च्या कथनानुसार वादी हा सदरचा रस्ता अडवित आहे व त्या रस्त्यावर काटेरी कुंपण लावण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे सदर रस्ता कायम खुला ठेवावा व रस्त्यामध्ये अडथळा करु नये अशा तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी प्रतिवादी क्र.१ याने केली आहे. याउलट वादीने त्याच्या उत्तरात संपूर्ण कथन नाकारले आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादीस पर्यायी रस्ता आहे. असे असतानाही तो वादीच्या शेतातून जाण्याचा प्रयत्न करीत

आहे. वादीच्या पुढील कथनाप्रमाणे आदेश ३९ नियम १ ब व क नुसार वादीस दाद मागता येईल परंतू त्या नियमानुसार प्रतिवादीस कोणतीही मागणी करता येणार नाही.

०६. निश्चीतपणे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ व २ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आदेश ३९ नियम १ ए नुसार वाद मिळकत ही नष्ट होत असेल तर किंवा दाव्यातील एखादा पक्षकार सदर मिळकत विकण्याचा प्रयत्न करीत असेल तर किंवा न्यायालयाच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या वेळेस वादमिळकत चुकीच्या मार्गाने विक्री केल्या जात असेल तर वादी किंवा प्रतिवादी तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज करु शकतात. आदेश ३९ नियम १–बी चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जर प्रतिवादी त्याची मिळकत विकत असेल किंवा विकण्याची धमकी देत असेल व तो हे कृत्य धनकोला फसविण्याकरीता करत असेल तर त्याच्याविरुद्ध वादी तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज करु शकतो. आदेश ३९ नियम १– सी नुसार प्रतिवादी वादमिळकत विकून वादीस हुसकावून लावण्याची धमकी देत असेल किंवा ईतर कोणत्या मार्गाने इजा करत असेल अशा परिस्थीतीत वादीस प्रतिवादीच्या विरुद्ध तात्पुरता मनाई हुकूम मागण्याचा अधिकार आहे.

०७. वर उल्लेखीत आदेश ३९ नियम १–ए, १–बी व १–सी चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आदेश ३९ नियम १–ए नुसारच प्रतिवादीस वादीच्या विरुद्ध तात्पुरता मनाई हुकूम मागण्याचा अधिकार आहे. परंतू, तो देखील कधी मागावा त्याबाबत स्पष्टपणे तरतुद आदेश ३९ नियम १–ए मध्ये असून त्या तरतुदीनुसार वादमिळकत वादमिळकतीचा नाश होत असेल किंवा तिचे नुकसान होत असेल किंवा सदरच्या मिळकतीची विक्री होत असेल किंवा मिळकतीची विक्री चुकीच्या मार्गाने हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या वेळी विक्री होत असेल तरच त्यातील वादीला तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी करता येईल. परंतू, या प्रकरणात

तशी कोणतीही बाब दिसून येत नाही. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र.१ ने केलेली विनंती विचारात घेतली तर सदरची विनंती आदेश ३९ नियम १–ए नुसार मंजूर करता येणार नाही.

०८. वादाकरता प्रतिवादी क्र.१ म्हणतो त्याप्रमाणे वादी त्याच्या रस्त्याला अडथळा करीत असल्याची बाब गृहित धरली तरी सदर अडथळा त्याने कधी केला व कशाप्रकारे केला याचा कोणताही उहापोह प्रतिवादी क्र.१ याने त्याच्या अर्जात केलेला नाही. याही कारणावरुन प्रतिवादी क्र.१ म्हणतो त्याप्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरणार नाही.

०९. वरील सर्व विवेचनावरुन प्रथमदर्शनी प्रकरण प्रतिवादी क्र.१ च्या बाजूस नाही. तसेच न्यायिक समतोल देखील त्याच्या बाजूने नाही व अर्ज मंजूर न केल्यास त्याचे न भरुन येणारे नुकसान होणार नाही या निष्कर्षास मी आलो आहे. त्या अनुषंगाने मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर नकाराथी नोंदवून मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

०१. प्रतिवादी क्र.१ चा तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

०२. अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र.१ यांनी सोसावा.

SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE
Digitally signed by SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE
Date: 2025.10.09 17:37:45 +0530

( एस. एस. सहस्त्रबुद्धे )
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाशिम.

दिनांक – ०९/१०/२०२५.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word to word, as per original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- S. V. Dere (Stenographer G-III) |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Washim. |
| 3) | Date | :- 09/10/2025 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 09/10/2025 |
| 5) | Order uploaded on | :- 10/10/2025 |